## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०९/२०१७

**१) संगनमत करुन चाकुचा धाक दाखवुन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०९/२०१७ चे १५.३० वा दर. यातील फिर्यादी व त्याचे ईतर कर्मचारी सरकारी नौकरीचे कर्तव्यावर असतांना यातील आरोपीचे घरी विद्युत बिलाची थकबाकीची रक्कम मागणे कामी गेले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व त्याचे सहकारी यांना थापड बुक्यांनी मारहान केली व गिट्टी फेकुन मारुन जखमी केले तसेच चाकु दाखवुन मारण्यास धावुन सरकारी कामात अडथळा निर्माण करुन कर्तव्यावरील सरकारी लोकसेवक यांना जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३,३३२,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०९/२०१७ चे ११.३० वा दर. यातील फिर्यादी ही आपले शेतात जनावरे चारीत असतांनी यातील आरोपीने फिर्यादी जवळ जावुन शारीरीक भोंगाची मागणी करुन तिच्यावर अत्याचार करण्याचा उद्देशाने फिर्यादीचे डाव्या हाताचे मनगट पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३५४(अ)(१)(२),५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**३) ईलेक्ट्रीक मोटार पंप व प्लास्टीक पाईपची चोरी . :—**

दिनांक १५/०९/२०१७ चे १८.०० वा ते १६/०९/२०१७ ०७.०० वा दर. यातील फिर्यादी बळीराम चिंधालोरे वय ७१ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी यांनी आपल्या शेतीला पाणी देण्याकरीता शेतीला लागुन असलेल्या नाल्यावर लावलेली सी. आर. आय. कंपनीची ईलेक्ट्रीक मोटार पंप २ एचपी किंमती १०,०००/—रु. व पिवळया रंगाचा प्लास्टीक पाईप २०० फुट किंमती २०००/—रु. असा एकुण १२,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०९/२०१७ चे ०२.१५ वा दर. यातील आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हीला दिनांक १६/०९/२०१७ चे ०२.०० वा. दर. कोणीही नसल्याची संधी साधुन तीला घराबाहेर बोलावुन मोटार सायकल वर बसवुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**५) गुटखा, पानमसाला, सुपारी, खर्रा यांचे पदार्थाचा उत्पादन साठा वितरण व विक्रीकर प्रतिबंद असलेले साहित्य मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १५/०९/२०१७ चे २२.३० वा दर. यातील गोपनीय खबरे वरुन आरोपी हा राहात असलेल्या किरायाचे घरी सापडा रचुन रेड घातले असता महाराष्ट्र शासन परिपत्रक दिंनाक १५/०७/२०१६ चे महाराष्ट्र शासन राजपत्र प्र.सु.मा.अ./अधीसुचना/५४८/१६/०७ गुटखा, पान मसाला सुगंधीत/स्वादीष्ठ तंबाखु/ सुंगधी स्वादीष्ठ सुपारी/ खर्रा हे पदार्थ अन्य कोणत्याही नावाने संबोधले जात असतील ते सर्व पदार्थाचा उत्पादन, साठा वितरण व विक्रीकर व प्रतीबंद घातलेला असल्या वरुन सुगंधीत तंबाखु ईत्यादी साहित्य किंमती १,१६,००५/-रु. चा माल आरोपीचे किरायाने राहते घरी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चव्हान यांचे रिपोर्ट वरुन फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १८८,२७२,२७३ भांदवि. सहकलम ४१(१)(ड)जाफौ. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**६) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :-**

दिनांक १६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून १० लिटर हा.भ. दारू किंमती १०००/-रु, ०४ लिटर ६८० मिली लिटर देशी दारु किंमती १४०४/-रु. तसेच जुगारातुन किंमती ८१०/-रु. असा एकुण किंमती ३,२१४/-रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.९९२१७४१६८१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.